# मुंबई विद्यापीठ

मुंबई– ४०० ०३२.

## विद्यापीठाच्या क्रीडा संकुलनावर संपन्न होणाऱ्या आंतरविद्यापीठीय क्रीडा स्पर्धा क्रीडा महोत्सव–२०१८ करीता भोजन व्यवस्था करणे

भोजन व्यवस्थेसाठी
ई–निविदा

भाग १ – ई–निविदा सुचना, सर्वसाधारण अटी शर्ती आणि सविस्तर माहिती
भाग २ – तांत्रिक लिफाफा (**Technical Bid**)
भाग ३ – कामाचे बाब वर्णन
भाग ४ – चहा, अल्पोपहार व भोजन दरपत्रक (**Financial Bid**)

दुरध्वनी क्रमांक: ०२२ – २२८१७६९८ / २२८२६०२७

सही/–
कुलसचिव,
मुंबई विद्यापीठ

# मुंबई विद्यापीठ

जा.क्र. क्रीडा/क्रीडा महोत्सव/९६/२०१८ दिनांक : १०/१२/२०१८

## ई–निविदा सूचना

मा. कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई यांचेकडून खालील कामासाठी (द्वि–लखोटा पध्दत) **ई–निविदा प्रणालीद्वारे (ऑन लाईन)** ई–निविदा मागविण्यांत येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | इसारा बयाणा रक्कम | भोजन व्यवस्था देण्याची तारीख | प्रत्येक ई–निविदा संचाची रक्कम ना परतावा |
|---|---|---|---|---|
| १ | **मुंबई विद्यापीठ, मुंबई येथे आंतर विद्यापीठीय ''क्रीडा महोत्सव – २०१८'' करीता भोजन व्यवस्था व इतर अनुषंगीत कामे करणे.** | ५०,०००/- | २७.०१.२०१९ ते ०१.०२.२०१९ | ५,०००/– |

## ई–निविदेचे वेळापत्रक

| अ. क्र. | मुंबई विद्यापीठाकडील कार्यवाही | कंत्राटदार/ठेकेदाराकडील कार्यवाही | दिनांक व वेळ पासून | दिनांक व वेळ पर्यंत |
|---|---|---|---|---|
| २. | –– | ई–निविदा डाउनलोड करणे<br>Tender Download | १३.१२.२०१८<br>वेळ: १०.०० वा. | २४.१२.२०१८<br>वेळ: १३.०० वा. |
| ३. | –– | ई–निविदा तपशिल तयार करणेसाठी कालावधी<br>Bid Preparation | १३.१२.२०१८<br>वेळ: १०.०० वा. | २४.१२.२०१८<br>वेळ: १५.०० वा. |
| ४. | –– | ई–निविदा पुर्व सभा<br>Prebid Meeting | १८.१२.२०१८<br>वेळ: १५.०० वा. | |
| ५. | तांत्रिक लखोटा बंद करणे<br>Technical Bid Closing | | २४.१२.२०१८<br>वेळ: १५.०० वा. | २४.१२.२०१८<br>वेळ: १७.३० वा. |
| ६. | आर्थिक लखोटा बंद करणे<br>Price Bid Closing | –– | २४.१२.२०१८<br>वेळ: १५.०० वा. | २४.१२.२०१८<br>वेळ: १७.३० वा. |
| ७. | –– | ई–निविदा ऑनलाईन सादर करणे<br>Bid Submission Or Online Bid Decryption & Re-encryption | २४.१२.२०१८<br>वेळ: १७.३१ वा. | २६.१२.२०१८<br>वेळ: १७.३० वा. |
| ७. | तांत्रिक लखोटा उघडणे<br>**(शक्य झाल्यास)**<br>Technical Bid Opening | –– | २७.१२.२०१८<br>वेळ: १२.०० वा. | २७.१२.२०१८<br>वेळ: १७.३० वा. |
| ८. | आर्थिक लखोटा उघडणे<br>**(शक्य झाल्यास)**<br>Price Bid Opening | –– | २७.१२.२०१८<br>वेळ: १२.०० वा. | २७.१२.२०१८<br>वेळ: १७.३० वा. |

**<u>टिप:</u> तांत्रिक व आर्थिक देकार उघडणे संदर्भातील दिनांकाबाबतची चौकशी तसेच इतर अनुषंगिक माहितीबाबत शंका असल्यास कृपया संचालक, शारीरिक शिक्षण व क्रीडा विभाग, मुंबई विद्यापीठ क्रीडा संकुल,मरीन लाईन्स, मुंबई — ४०० ०२० (फोन नं.०२२—२२८१७६९८/२२८२६०२७) येथे संपर्क साधावा.**

१. सर्व पात्र/इच्छुक निविदाकारांनी सविस्तर निविदापत्रक डाऊनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी ई—निविदा प्रणालीच्या Portal https://dhe.maharashtra.etenders.in येथे मदत व संपर्क करणे आवश्यक आहे.

२. निविदाकारांना वर नमुद केलेल्या संकेतस्थळावर ऑनलाईन निविदा सादर करणे संदर्भात काही शंका/अडचणी असल्यास त्यांनी Nextenders India Private Ltd. Pune दुरध्वनी क्रमांक. ०२०—२५३१५५५५ येथे संपर्क साधावा.

३. निविदाकारांनी निविदा संदर्भात सर्व दस्तऐवज ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहील.

४. इतर अटी व शर्ती ई निविदा नमुन्यामध्ये पहावयास मिळतील. सदर कामांची एक अथवा सर्व ई—निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखुन ठेवलेले आहेत.

५. वरील कामांची सविस्तर सुचना https://dhe.maharashtra.etenders.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**सही/—**
**कुलसचिव**
**मुंबई विद्यापीठ**

## भाग — १
## <u>सर्वसाधारण अटी व शर्ती</u>

१. **शासकीय धोरणान्वये ई—निविदेची कागदपत्रे ही ऑनलाईन सादर करावयाची असल्याने ई—निविदा करीता सादर करावयाची कागदपत्रे कार्यालयात लखोट्यामध्ये पुन:श्च सादर करण्याची आवश्यकता नाही.**

२. तांत्रिक लखोट्यामधील कागदपत्रांच्या पूर्ततेबाबत आवश्यकता भासल्यास प्रत्यक्ष **मुळ कागदपत्रांची** पहाणी करणेत येईल. तांत्रिक लखोट्यामधील कागदपत्रांची सत्यता व अन्य तपासणी असमाधानकारक आढळणाऱ्या निविदाधारकांची निविदा रद्द करुन त्याबाबत कोणत्याही प्रकारे स्वतंत्ररित्या कळविण्यात येणार नाही.

३. सदर कामाची ई—निविदा फॉर्म फी, निविदा फॉर्म डाऊनलोड करण्यापूर्वी संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने जमा करावी लागेल तसेच इसारा रक्कम (EMD) देखील ऑनलाईन पध्दतीने जमा करावयाची आहे. ठेकेदाराने सर्व रक्कमा या ऑनलाईन पध्दतीने नियमानुसार जमा करावयाच्या आहेत. तसेच सदर बाबत कोणत्याही प्रकारची रक्कम ही प्रत्यक्षात विद्यापीठाच्या कोणत्याही खात्यामध्ये बॅंकेद्वारे जमा करावयाची नाही. म्हणजेच सर्व व्यवहार हा डेबीट किंवा क्रेडिट कार्ड, नेट बॅंकिंगद्वारेच करावयाचा आहे. बॅंक कमीशन किंवा बॅंकेचे इतर चार्जेस वजा जाता या कार्यालयाची निविदेची इसारा बयाणा आणि निविदा संचाची रक्कम जमा करणे आवश्यक आहे.

४. शासन निर्णय क्र. बीसीए.२००९/प्र.क्र.१०८/कामगार ७—अ, दिनांक १७/६/२०१० अन्वये कामगार कल्याण उपकर नियम १९९८ अनुषंगाने ठेकेदाराचे देयकामधून देयकाच्या रक्कमेच्या <u>**१ टक्का लेबर सेस**</u> वसूल करण्यात येईल.

५. ठेकेदाराने त्यांचे कामावर नेमणेत येणाऱ्या **मजूरांचा विमा** हा संचालक, विमा संचालनालय, महाराष्ट्र शासन, बांद्रा, मुंबई यांचेकडून प्राप्त करणे बंधनकारक आहे. त्यापोटी त्यांनी आवश्यक ते प्रमाणपत्र या कार्यालयाकडे सादर करावयाचे आहे. प्रमाणपत्र सादर न केल्यास शासनाने विहित केलेल्या नियमांनुसार बिलामधून विम्यापोटी येणाऱ्या रकमेची वजावट करणेत येईल याची नोंद घ्यावी.

६. कंत्राटदारानी सादर केलेल्या देयकामधून शासकीय कराची नियमानुसार वेळोवेळी कपात केली जाईल.

७. निविदाकारांना वर नमुद केलेल्या संकेतस्थळावर ऑनलाईन सादरीकरण करणे संदर्भात व डिजिटल प्रमाणपत्र वितरीत करण्यासंदर्भात काही शंका/अडचणी असल्यास त्यांनी पुढील दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा— Sify Techonoligies Ltd., Nextender (India) Pvt. Ltd. (020) 25315555, Email:-<u>support.gom@nextenders.com</u>

८. निविदा उघडण्याच्या तारखेला सुट्टी जाहीर झाली असल्यास त्या दिवसाचे कामकाज लगतच्या पुढील कामकाजाच्या दिवशी पार पाडणेत येईल.

९. ज्या निविदाकाराची निविदा मंजूर केली जाईल त्यांना दिलेल्या दोन दिवसांच्या मुदतीत एकुण रक्कमेच्या ३ टक्के रक्कम सुरक्षा ठेव (Security Deposit) जमा करणे बंधनकारक आहे. त्या रकमेवर कुठल्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही.

१०. ज्या निविदाकारांची कागदपत्रे खोटी आढळुन येतील अशा निविदाकाराची अनामत रक्कम (EMD) जप्त करण्यात येईल.

११. ज्या कंत्राटदाराची निविदा स्विकारण्यात येईल, त्या कंत्राटदारास रू. १००/– चे बॉन्ड पेपरवर या कार्यालयाने विहीत केलेल्या नमुन्यामध्ये करारनामा करुन द्यावा लागेल.

१२. इतर अटी व शर्ती ई–निविदा नमुन्यामध्ये पहावयास मिळतील. कोणतेही कारण न देता कोणतीही निविदा किंवा सर्व निविदा कोणत्याही स्तरावर नामंजूर करण्याचा हक्क निम्नस्वाक्षरीकार यांनी राखून ठेवलेला आहे.

१३. निविदेमधील कामे ही कालमर्यादित असल्याने कार्यादेश दिल्यापासून सदरची कामे विहीत मुदतीमध्ये पूर्ण करणे ठेकेदारास बंधनकारक राहील.

१४. शासनाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात येणाऱ्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार निविदा अंतिम करण्याचे अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांचेकडे राहतील.

१५. उपहारगृह व्यवसायाचा व व्यवस्थापनाचा अनुभव असलेल्या लायक उपहारगृह व्यवसाय मालकांची निविदा विद्यापीठाकडून स्विकारण्यात येईल. त्याने सहाय्यक आयुक्त अन्न आणि औषध प्रशासन, (महाराष्ट्र शासन) यांचे व्यवसायाचे परवाना प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

१६. भोजनासाठी उपस्थित अतिथींना जेवण वाढणे व तत्सम सेवा पुरविण्याची जबाबदारी स्विकृत निविदाधारकांची राहील. भोजन वाढण्यासाठी असलेला कर्मचारी वर्ग योग्यत्या गणवेशातच असणे आवश्यक आहे. संबंधीत ठेकेदारास उपरोक्त व्यवसायाचा किमान पाच वर्षाचा अनुभव असला पाहिजे.

१७. भोजन व्यवस्था मुंबई विद्यापीठाच्या विद्यानगरी परिसरात स्पर्धेसाठी आलेल्या पुरूष व महिला खेळाडूंची भोजन व्यवस्था विद्यानगरी संकुलामध्ये व इतर सर्व अतिथी, निमंत्रित व अधिकारी/कर्मचारी यांची भोजन व्यवस्था करायची आहे. ताटे, वाटया, ग्लास, हात धुण्यासाठी बेसिन, बुफे काऊंटर (आवश्यक त्या मांडणी साहित्यासहीत) यांची व्यवस्था ठेकेदाराने करावयाची आहे.

१८. दिनांक २७ जानेवारी, २०१९ ते १ फेब्रुवारी, २०१९ पर्यंत खाद्यपान सेवा सर्व भांडी, इतर साहित्य तसेच स्वयंपाक करण्याचा व वाढण्याचा जागा स्वच्छ ठेवावी लागेल व संपूर्ण परिसर स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी कंत्राटदारावर राहील.

१९. भोजन तयार करणेसाठी पाणी आणि वीज यांचा पुरवठा विद्यापीठामार्फत होईल.

२०. गरम जेवण देण्याची व्यवस्था बंधनकारक आहे. तसेच खाद्य पदार्थाद्वारे जिवीतास हानी पोहचेल असे प्रकार घडल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी खाद्य प्रबंधकाची राहील किंवा असे प्रकार निदर्शनास आल्यास दंडात्मक कार्यवाही करणेबाबत शिफारस करण्यात येईल.

२१. खाद्य प्रबंधकाने वरील कार्यक्रमादरम्यान त्याच्या कार्यक्षेत्राशी संबधीत असलेल्या स्थानिक प्राधीकरणाच्या सर्व परवानग्या स्वत: प्राप्त करुन घेवून त्या निम्नस्वाक्षरीकारांकडे सादर करणे बंधनकारक राहील.

२२. पिण्यासाठी मिनरल वॉटर ठेकेदाराने पुरवायचे आहे.

२३. इच्छुक कंत्राटदारांनी निविदा भरण्यापुर्वी प्रत्यक्ष कार्यस्थळाची पाहणी व कामाचे स्वरूप समजावून घेणे अपेक्षित आहे.

२४. संयुक्त भागीदारी (Joint Venture) स्वरुपातील संस्था सदर निविदेस पात्र ठरणार नाहीत.

२५. निविदा पुर्व बैठक (Prebid Meeting) दिनांक १८.१२.२०१८ रोजी १५.०० वा. **वित्त व लेखा विभाग, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई – ४०० ०३२** येथे आयोजित केली आहे. (निविदा संदर्भात शंका विचारण्यासाठी नमुना क्र. १ सोबत जोडला आहे.)

२६.निविदा स्विकारणे/उघडणे बाबतच्या तारखा मधील बदलाबाबत विद्यापीठ प्रशासनाचा निर्णय अंतिम राहील.

२७.कोणतीही निवीदा मंजुर करणे अथवा सर्व निविदा ना–मंजुर करून पुर्ननिविदा करण्याचा अधिकार विद्यापीठाने राखुन ठेवला आहे.

२८. सदर क्रीडा महोत्सव–२०१८ कार्यक्रम हा **मुंबई विद्यापीठ क्रीडा संकुल, विद्यानगरी संकुलन, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई – ४०० ०९८** येथे दिनांक २७ जानेवारी, २०१९ ते ०१ फेब्रुवारी, २०१९ या कालावधीत साजरा होणार आहे.

अधिक माहितीसाठी **संचालक, शारीरिक शिक्षण व क्रीडा विभाग, विद्यापीठ क्रीडा संकुल, मरीन लाईन्स, मुंबई – ४०० ०२० (फोन नं.०२२–२२८१७६९८/२२८२६०२७)** यांचेकडे कामाचे दिवशी कार्यालयीन वेळेत निविदाकारास संपर्क साधता येईल.

**सही/–**
**कुलसचिव,**
**मुंबई विद्यापीठ**

# भाग — २

## लिफाफा क्र. १ (तांत्रिक लिफाफा)

तांत्रिक लिफाफा मधील आवश्यक कागदपत्रे

१. सर्व पात्र/इच्छुक निविदाकारांनी निविदापत्रक डाउनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी ई–निविदा प्रणालीचे मुख्य संकेतस्थळ https://maharashtraetenders.in किंवा https://dhe.maharashtra.etenders.in येथे नोंदणी करणे आवश्यक आहे. निविदा प्रक्रीयेत सहभागी होणाऱ्या ठेकेदारांना ऑनलाईन निविदा तयार करण्यासाठी**रु.१,०९२/–** मात्र प्रति निविदा ऑनलाईन जमा करावे लागतील. सदरहू रक्कम ठेकेदाराने ई–निविदा Decryption/Re-encryptionकरणेचे कालावधीमध्ये ऑनलाईन जमा करणे आवश्यक आहे.

२. **खालील प्रमाणे ठेकेदारांनी ई–निविदेची कागदपत्रे शासकीय संकेतस्थळावर अपलोड करावीत. तसेच सर्व कागदपत्रे हे स्व:साक्षाकित (self attested) असणे आवश्यक आहे.**

१. जी.एस.टी प्रमाणपत्र
२. उपाहारगृह व्यवसाय परवाना पत्र / अन्न भेसळ विभागाकडील नोंदणी प्रमाणपत्र (गुमास्ता).
३. पॅनकार्ड
४. शासकीय व निमशासकीय विभागामध्ये एकावेळी रु. १० लाख इतक्या रकमेचे समाधानकारक काम केल्याचे सबंधीतानी दिलेल्या प्रमाणपत्राची प्रत.
५. ठेकेदाराने ज्या नावाने निविदा भरलेली आहे, फक्त त्यांचेच मागील ३ वर्षातील (सन २०१५–१६, २०१६–१७ व २०१७–१८) उलाढालीच्या रकमेची माहिती सनदी लेखापाल यांचेकडून प्रमाणित प्रत सादर करणे तसेच मागील ३ वर्षापैकी १ वर्षातील उलढाल रु.२५ लाख इतक्या रकमेची असणे आवश्यक आहे.
६. ऑनलाईन सादर केलेली कागदपत्रे खरी असल्याचे, निविदेतील अटी व शर्ती मंजूर असल्याचे व काळया यादीत समाविष्ट नसल्याचे (नमुना क्र. २) नुसार प्रतिज्ञापत्र रू.१००/– (रू.शंभर रुपये) च्या नोटरीसह बॉन्ड पेपरवर सादर करावे.
७. ठेकेदाराने मागील ३ वर्षांचे (सन २०१५–१६, २०१६–१७ व २०१७–१८) आयकर भरल्याचे प्रमाणपत्र.
८. निविदाराने लिफाफा क्र. १ सोबत सादर केलेल्या कागदपत्राच्या सत्यतेसाठी हमीपत्र सादर करणे बंधनकारक आहे. (नमुना क्र. ३)

**सही/–**
**कुलसचिव,**
**मुंबई विद्यापीठ**

## नमुना क्र. १

### निविदा पुर्व शंका विचारण्यासाठीचा नमुना

१. ठेकेदाराचे संपूर्ण नाव :—

२. विभागाचे नाव :—

३. निविदा संदर्भ क्र.:—

४. निविदेचे शिर्षक :—

५. निविदेची अंतिम दिनांक :—

| अ. क्र. | निविदेतील संदर्भिय पान क्रमांक | निविदेतील संदर्भिय मुद्दा क्रमांक | मुद्दयाचे नाव | शंका /स्पष्टीकरण | ठेकेदाराचे समर्थन |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

निविदाकाराची स्वाक्षरी / नाव व शिक्का

## नमुना क्र. २
### प्रतिज्ञापत्र (नोटरीसह)

**प्रती,**
**मा. कुलसचिव,**
**मुंबई विद्यापीठ,**
**फोर्ट,**
**मुंबई – ४०० ०३२.**

मी प्रतिज्ञेवर सादर करतो की, ------------------------------ भोजन व्यवस्थेच्या निविदेतील सर्व अटी व शर्ती मी वाचल्या असुन त्या मला पुर्णतः मान्य आहेत.

१. निविदेत सादर केलेली सर्व कागदपत्रे सत्य व खरी असुन त्यात कोणतेही फेरफार केलेले नाहीत. निविदेत नमुद केलेले दर हे सर्वकर (G.S.T. सह) सर्वसमावेश असुन विना अट आहेत.
२. तसेच मला अथवा माझ्या संस्थेस कोणत्याही शासकीय व निमशासकीय शासन अंगीकृत उपक्रमाने काळया यादीत समाविष्ट केलेले नाही वा अशी कारवाई प्रगतीत/प्रस्तावित नाही.
३. बालमजुरी, कामगार कायदे, लैंगिग पिळवणुक, मानवाधिकार ई. विषयी आवश्यक धोरणाचेही आमच्याकडून पालन होते.

वरील नमुद केलेली सर्व माहिती मान्य असुन यात चुक आढळल्यास भारतीय दंडसंहितेनुसार मी कारवाईस पात्र असेल याची मला पूर्ण जाणीव आहे.

**निविदाकाराची स्वाक्षरी / नाव व शिक्का**

## नमुना क्र. ३
## हमीपत्र

**प्रती,**
**मा. कुलसचिव,**
**मुंबई विद्यापीठ,**
**फोर्ट,**
**मुंबई – ४०० ०३२.**

मी प्रतिज्ञेवर सादर करतो की, ––––––––––––––––––––––––––––––––– भोजन व्यवस्थेच्या निविदेतील सर्व अटी व शर्ती मी वाचल्या असुन त्या मला पुर्णत: मान्य आहेत.

१. निविदेत सादर केलेली सर्व कागदपत्रे सत्य व खरी असुन त्यात कोणतेही फेरफार केलेली नाही. निविदेत नमुद केलेले दर हे सर्वकर (G.S.T. सह) सर्वसमावेश असुन विना अट आहेत.
२. तसेच मला अथवा माझ्या संस्थेस कोणत्याही शासकीय व निमशासकीय शासन अंगीकृत उपक्रमाने काळया यादीत समाविष्ट केलेले नाही वा अशी कारवाई प्रगतीत/प्रस्तावित नाही.
३. बालमजुरी, कामगार कायदे, लैंगिग पिळवणुक, मानवाधिकार ई. विषयी आवश्यक धोरणाचेही आमच्याकडून पालन होते.
४. ई–निविदे सोबत सादर केलेले सर्व कागदपत्रे सत्यतेसाठी सही शिक्क्यानिशी स्व:साक्षांकित (Self Attestd) केलेली आहेत.

वरील नमुद केलेली सर्व माहिती मान्य असुन यात चुक आढळल्यास भारतीय दंडसंहितेनुसार मी कारवाईस पात्र असेल याची मला पूर्ण जाणीव आहे.

**निविदाकाराची स्वाक्षरी / नाव व शिक्का**

# DECLARATION OF THE CONTRACTOR

I/We hereby declare that I/we have made myself / ourselves thoroughly conversant with the local conditions regarding catering services and labour on which I/we have based my/our rates for this tender. The specifications on this work have been carefully studied and understood by me/us before submitting this tender. I/we undertake to use only the best materials in catering services.

I/We hereby undertake to pay the laborers engaged on the work as per minimum wages Act 1948 applicable to the Zone concerned.

**Signature of Contractor**
**(Name, Address & Stamp)**

**भाग —३ (कामाचे बाब वर्णन)**

**२२ वी महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा स्पर्धा**

**क्रीडा महोत्सव —२०१८**

## अमर्यादित नास्ता व जेवणाच्या मेनूची यादी

| दिनांक | **नाष्टा (सकाळी)**<br>वेळ: ७.३० ते ९.३० वा. | **मैदानावर चहा (कपसह)**<br>वेळ: १०.३० ते ११.०० वा. | **दुपारचे जेवण**<br>वेळ: १२.०० ते १५.०० वा. | **सायंकाळी मैदानावर चहा (कपसह)**<br>वेळ: १६.०० ते १८.००वा. | **रात्रीचे जेवण**<br>वेळ : २०.०० जे २२.०० वा. |
|---|---|---|---|---|---|
| **रविवार**<br>२७/०१/२०१९ | १) पोहे<br>२) उपमा<br>३) चहा<br>४) दूध<br>५) केळी — २ प्रत्येकी<br>६) उकडलेली अंडी — २ प्रत्येकी | सुमारे ४००<br>व्यक्तीसाठी | १) चपाती २) पुरी ३) भात<br>४) वरण ५) लोणचे ६) पापड<br>७) ताक ८) कोशिंबीर<br>९) मीठ १०) बटाटा भाजी<br>११) कुर्मा | चहा / कॉफी आणि<br>४ — बिस्कीट (प्रती व्यक्तीं)<br>सुमारे ४०० व्यक्तीसाठी | १) चपाती २) पुरी ३) भात<br>४) वरण ५) लोणचे ६) पापड<br>७) सोलकढी ८) कांदा व लिंबू<br>९) ग्रीन सलाड १०) मीठ<br>११) पनीर मसाला १२) तांदळाची खिर<br>१३) चिकन १४) मच्छी |
| **सोमवार**<br>२८/०१/२०१९ | १) इडली सांबार, चटणी<br>२) मेंदूवडा<br>३) जॅम, ब्रेड बटर<br>४) दूध ५) चहा<br>६) केळी — २ प्रत्येकी<br>७) उकडलेली अंडी — २ प्रत्येकी | सुमारे ४००<br>व्यक्तीसाठी | १) चपाती २) पुरी ३) भात<br>४) वरण ५) लोणचे ६) पापड<br>७) ताक ८) कोशिंबीर<br>९) मीठ १०) मोड आलेल्या कडधान्यांची आमटी<br>११) बटाटा भाजी १२)उसळ<br>१३) बासुंदी १४) कढी भजी | चहा / कॉफी आणि<br>४ — बिस्कीट (प्रती व्यक्तीं)<br>सुमारे ४०० व्यक्तीसाठी | १) चपाती २) पुरी ३) भात<br>४) वरण ५) लोणचे ६) पापड<br>७) सोलकढी ८) कांदा व लिंबू<br>९) ग्रीन सलाड १०) मीठ<br>११) छोले मसाला<br>१२) भरलेली वांगी १३) श्रीखंड |
| **मंगळवार**<br>२९/०१/२०१९ | १) मिसळ पाव<br>२) शिरा ३) बुर्जी ब्रेड<br>४) दूध ५) चहा<br>६) केळी — २ प्रत्येकी<br>७)उकडलेली अंडी — २ प्रत्येकी | सुमारे ४००<br>व्यक्तीसाठी | १) चपाती २) पुरी ३) भात<br>४) वरण ५) लोणचे ६) पापड<br>७) ताक ८) कोशिंबीर<br>९) मीठ १०) खीर शेवया<br>११) वांगी — बटाटा मिक्स<br>१२) मटकी उसळ<br>१३) दही | चहा / कॉफी आणि<br>४ — बिस्कीट (प्रती व्यक्तीं)<br>सुमारे ४०० व्यक्तीसाठी | १) चपाती २) पुरी ३) भात<br>४) वरण ५) लोणचे ६) पापड<br>७) सोलकढी ८) कांदा व लिंबू<br>९) ग्रीन सलाड १०) मीठ<br>११) पनीर बुर्जी<br>१२) कोबीची भाजी<br>१३) गाजर हलवा |

| दिनांक | नाष्टा (सकाळी)<br>वेळ: ७.३० ते ९.३० वा. | मैदानावर चहा (कपसह)<br>वेळ: १०.३० ते ११.०० वा. | दुपारचे जेवण<br>वेळ: १२.०० ते १५.०० वा. | सायंकाळी मैदानावर चहा (कपसह)<br>वेळ: १६.०० ते १८.००वा. | रात्रीचे जेवण<br>वेळ : २०.०० जे २२.०० वा. |
|---|---|---|---|---|---|
| **बुधवार**<br>३०/०१/२०१९ | १) बटाटा वडा सांबार<br>२) पोहे<br>३) चहा<br>४) दूध<br>५) केळी – २ प्रत्येकी<br>६) उकडलेली अंडी – २ प्रत्येकी | सुमारे ४००<br>व्यक्तीसाठी | १) चपाती २) पुरी ३) भात<br>४) वरण ५) लोणचे ६) पापड<br>७) ताक ८) कोशिंबीर<br>९) मीठ १०) जिलेबी/मठ्ठा<br>११) भरलेली वांगी<br>१२) चवळी उसळ | चहा / कॉफी आणि<br>४ – बिस्कीट<br>सुमारे ४०० व्यक्तीसाठी | १) चपाती २) पुरी ३) भात<br>४) वरण ५) लोणचे ६) पापड<br>७) सोलकढी ८) कांदा व लिंबू<br>९) ग्रीन सलाड १०) मीठ<br>११) भेंडी मसाला १२) कुर्मा<br>१३) चिकन १४) मच्छी |
| **गुरुवार**<br>३१/०१/२०१९ | १) पोहे / उपमा<br>२) पुरी भाजी<br>३) बुर्जी ब्रेड<br>४) केळी – २ प्रत्येकी<br>५) उकडलेली अंडी – २ प्रत्येकी | सुमारे ४००<br>व्यक्तीसाठी | १) चपाती २) पुरी ३) भात<br>४) वरण ५) लोणचे ६) पापड<br>७) ताक ८) कोशिंबीर<br>९) मीठ १०) भेंडी बटाटा भाजी<br>११) राजमा भाजी<br>१२) रसमलाई | चहा / कॉफी आणि<br>४ – बिस्कीट<br>सुमारे ४०० व्यक्तीसाठी | १) चपाती २) पुरी ३) भात<br>४) वरण ५) लोणचे ६) पापड<br>७) सोलकढी ८) कांदा व लिंबू<br>९) ग्रीन सलाड १०) मीठ<br>११) मटार+फ्लॉवर भाजी<br>१२) वालाची उसळ<br>१३) मुगशिरा |
| **शुक्रवार**<br>०१/०२/२०१९ | १) शिरा<br>२) इडली सांबार चटणी<br>३) केळी – २ प्रत्येकी<br>४) उकडलेली अंडी – २ प्रत्येकी | सुमारे ४००<br>व्यक्तीसाठी | १) चपाती २) पुरी ३) भात<br>४) वरण ५) लोणचे ६) पापड<br>७) ताक ८) कोशिंबीर<br>९) मीठ १०) मसाला भात<br>११) तांदळाची खीर<br>१२) छोले मसाला १३) कुर्मा | चहा / कॉफी आणि<br>४ – बिस्कीट<br>सुमारे ४०० व्यक्तीसाठी | १) चपाती २) पुरी ३) भात<br>४) वरण ५) लोणचे ६) पापड<br>७) सोलकढी ८) कांदा व लिंबू<br>९) ग्रीन सलाड १०) मीठ<br>११) मिक्स व्हेज भरलेली वांगी<br>१२) गुलाबजाम १३) मच्छी<br>१४) चिकन |

———३———

| दिनांक | नाष्टा<br>वेळ: ७.३० ते ९.३० | मैदानावर चहा (कपसह)<br>वेळ: १०.३० ते ११.०० | दुपारचे जेवण<br>वेळ: १२.०० ते १५.०० | चहा (कपसह)<br>वेळ: १६.०० ते १७.०० | मैदानावर चहा (कपसह)<br>वेळ : १७.०० ते १८.०० | रात्रीचे जेवण<br>वेळ : २०.०० जे २२.०० |
|---|---|---|---|---|---|---|
| ***शनिवार**<br>०२/०२/२०१९ | १) पोहे २) शिरा<br>३) चहा<br>४) केळी – २ प्रत्येकी<br>५) उकडलेली अंडी – २ प्रत्येकी | ——— | ——— | ——— | ——— | ——— |

**टिप**:— अ) पिण्यासाठी पाणी मिनरल वॉटरचे पुरविणे आवश्यक आहे.

ब) ६० ते ७० टक्के शाकाहारी आणि ४० ते ३० टक्के मासांहारी.

क) आदल्या दिवशी पुढच्या दिवशीच्या ताटांची संख्या सांगितली जाईल.

ड) दिनांक २७.०१.२०१९ ते ०१.०२.२०१९ या कालावधीत प्रतिदिन अंदाजे ३००० ते ३५०० व्यक्तींसाठी जेवणाची व्यवस्था करावी लागेल.

इ) दिनांक ०२.०२.२०१९ च्या दिवशी सुमारे १००० व्यक्तींसाठी नाश्ताची व्यवस्था करावी लागेल.

सही/—
कुलसचिव,
मुंबई विद्यापीठ

# भाग — ४
# लिफाफा क्र. २
## (चहा, अल्पोपहार व भोजन दरपत्रक) (Financial Bid)

❖ मुंबई विद्यापीठ, मुंबई येथे आयोजित करण्यात येणा—या आंतर विद्यापीठीय क्रीडा महोत्सव — २०१८ करीता भोजन व्यवस्थेच्या ई—निविदाबाबत नियोजित निविदा पूर्वसभा (Prebid Meeting) मंगळवार दि. १८ डिसेंबर, २०१८ रोजी दु. ३.०० वा. वित्त व लेखा विभाग, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई — ४०० ०३२ येथे आयोजित करण्यात आली होती. सदर सभेला एकुण ३ ठेकेदार/प्रतिनिधी उपस्थित होते, चर्चेअंती लिफाफा क्र. २ (चहापान, अल्पोपहार व भोजन व्यवस्था दरपत्रक) (Financial Bid) मध्ये खालीलप्रमाणे दुरुस्ती सुचविण्यात आली आहे.

कामाचे नाव :— दि. २७ जानेवारी, २०१९ ते दि. १ फेब्रुवारी, २०१९ च्या दरम्यान मुंबई विद्यापीठाच्या क्रीडा संकुलनावर संपन्न होणाऱ्या आंतर विद्यापीठीय क्रीडा स्पर्धा क्रीडा महोत्सव—२०१८ करीता भोजन व्यवस्था करणेबाबत.

| अ. क्र. | कामाचे विवरण | सर्व करांसहीत एकत्रित दर — प्रतिव्यक्ती /प्रतिदिन याप्रमाणे दर |
|---|---|---|
| १. | आंतर विद्यापीठीय क्रीडा स्पर्धा क्रीडा महोत्सव — २०१८ च्या स्पर्धेसाठी चहापान, अल्पोपहार व भोजन व्यवस्था इ. वरील मेनुनूसार दि. २७ जानेवारी, २०१९ ते २ फेब्रुवारी, २०१९ या कालावधीत पुरवठा करणे. | रुपये ................................................<br><br>(अक्षरी रुपये ......................................................<br>........................................ फक्त )<br>प्रतिव्यक्ती /प्रतिदिन. |

ई—निविदेतील अटी, शर्तीनुसार व निविदेत नमुद केलेल्या दिनांक २७/०१/२०१९ ते ०२/०२/२०१९ या कालावधीत मेन्यू मी वाचला असुन, त्यानुसार मी उपरोक्तप्रमाणे प्रति व्यक्ती / प्रतिदिन याप्रमाणे दर, विनाअट नमुद करीत आहे.

निविदाकाराची स्वाक्षरी